बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ११ ऑक्टोबर २०२५**

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७१५/२०२५ भा.न्या.सहिता कलम ३०९(४),३३१(४),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/१०/२०२५ रोजी रात्री ०२.०० वा ते ०३.०० वा चे दरम्यान, बिल्डींग नं डी ०९, फ्लॅट नं. बी ५, तिसरा माळा, आवंती हौसिंग सोसायटी, आवंती नगर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/१०/२०२५ रोजी ११.०० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सागर प्रदिप अन्नदाते, वय- ४० वर्षे, रा. बिल्डींग नं डी ०९, फ्लॅट नं. बी ५, तिसरा माळा, आवंती हौसिंग सोसायटी, आवंती नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अनोळखी ४ इसम अंदाजे ३० ते ४० वर्षे वयाचे |
| **गेला माल** | | फिर्यादी यांचा गेला माल<br>१) २०,०००/- रु सोन्याचे मणी मंगळसुत्र त्यामध्ये काळे मणी व दोन वाटया ४ ग्रॅम वजनाचे<br>२) ४,०००/- रु रोख रक्कम<br>एकुण- २४,०००/- रु<br>सरिता राजुसिंग गौर यांचेकडील गेला माल<br>१) २०,०००/- रु सोन्याचे मणी मंगळसुत्र काळे मणी व दोन वाटया एकुण ४ ग्रॅम वजनाचे<br>२) ५०,०००/- रु सोन्याचे दोन जोड कानातील फुल झुबे १० ग्रॅम वजनाचे<br>३) १०,०००/-रु एक सोन्याची लेडीज अंगठी दोन ग्रॅम वजनाची<br>४) ५,०००/- रु एक लहान मुलाची सोन्याची अंगठी १ ग्रॅम वजनाची<br>५) ५,०००/- रु रोख रक्कम<br>एकुण- ९०,०००/- रु |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व पत्नी असे घरात मुख्य दरवाजाला कडी लावून झोपलेले असताना चार अनोळखी इसम त्या पैकी एका इसमाचे हातात एक धारधार चाकु होता व एका इसमाचे हातात लोखंडी कटावणी होती. उर्वरीत दोन इसमांचे हातात लोखंडी रॉड अशा इसमांनी जबरदस्तीने फिर्यादीच्या घराचा मुख्य दरवाजा तोडुन आत घुसुन फिर्यादी व फिर्यादीचे कुटुंबीयांना चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे कपाटातील रोख रक्कम व फिर्यादीचे पत्नीच्या गळयातील मणी मंगळसुत्र जबरदस्तीने काढुन घेतले. तसेच फिर्यादीच्या बिल्डींग मधील दुसऱ्या माळयावर राहणाऱ्या सरीता राजुसिंग गौर या देखील त्यांचे घरात झोपलेल्या असताना चार इसमांपैकी एक इसम हातात लोखंडी रॉड घेवून फिर्यादीजवळ थांबला व इतर तीन आरोपीतांनी त्यांचे घराचा दरवाजा जबरदस्तीने तोडुन घरात प्रवेश करुन त्यांना देखील चाकुचा धाक दाखवुन त्यांचे घरातील लोखंडी कपाटातील वरील वर्णनाचा ऐवज चोरी केले आहे. म्हणून.<br>तपास:- सपोनि- क्षिरसागर- **९६५३२८९४४९** |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६८५/२०२५ भा.न्या.सहिता कलम २८१,१२५(a)(b), मोवाकाक १८४,१३४,१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २६/०८/२०२५ रोजी १३.३० वा चे सुमारास, मित्र नगर कॉर्नरला शेळगी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ११/१०/२०२५ रोजी १५.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | चंद्रशेखर वैजनाथ पाटील, वय- २९ वर्षे, रा. मित्रनगर, वैष्णवी माता मंदिकडे, शेळगी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | मल्लिकार्जुन खंडु हंडे, रा. दहिटणे, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी थांबलेले असताना, वरील आरोपीताने त्याचे ताब्यातील दुचाकी वाहन हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगाने चालवून फिर्यादीस धडक देवून फिर्यादीच्या पायाचे टाचेजवळचे हाड क्रॅक करुन गंभीर जखमी करुन, मार्केट यार्डच्या दिशेने न थांबता निघुन गेला म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३७८ वाघमारे- |